**सेशन केस नं. ३३/१५**
**सा.क्र.२ निशाण क्र.४३**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
माझे नांव :— विठ्ठल वडिलांचे नांव :— वसंत धुरी,
वय सुमारे :— ३८ वर्षे व्यवसाय :— पोलीस नाईक,
ब.क्र.५६१, वेंगुर्ला पो.ठा.
रहाणार :— वेंगुर्ले, तालुका :— वेंगुर्ला , जिल्हा:—सिंधुदुर्ग

........................

**अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. तोडकरी सरतपासणी**

दि.२८/११/२०१४ रोजी मी मालवण पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो. घटनेपुर्वी ५ वर्षे मी मालवण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. दि.२८/११/२०१४ रोजी मी भरडनाका येथे वाहतुक नियंत्रक, नाका बंदी व पेट्रोलिंग डयुटीवर होतो. सदरची डयुटी ही २७/११/२०१४ रोजी रोलकॉलवर ठरविली होती. रोलकॉलच्या वेळी मी पोलीस स्टेशनमध्ये हजर होतो. डयुटी नेमणूकी बाबतची नोंद डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये केली जाते. पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस हे देखील माझेसोबत नाकाबंदी डयुटीवर होते.

२. दि.२८/११/२०१४ रोजी मी प्रथम पोलीस स्टेशनला गेलो, त्यानंतर ड्रेसवर मी भरडनाका येथे सकाळी ०९.०५ वाजता डयुटीवर रवाना झालो व तशी नोंद स्टेशन डायरीला घेणेत आली. माझे अंगावर त्यावेळी ट्राफिक पोलीसचा पांढरा शर्ट व खाकी पॅन्ट असा ड्रेस होता. मी दुपारी एक वाजेपर्यंत डयुटी केली व पोलीस स्टेशनला गेलो. त्यानंतर ४.०० वाजता मी पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस यांचेबरोबर पुन्हा भरडनाका येथे नाकाबंदीसाठी गेलो. आम्ही सायंकाळी सहा वाजेपर्यंत नाकाबंदी डयुटी केली. सायंकाळी ६.०० वाजता आम्ही बाजारपेठ पेट्रोलिंगसाठी रवाना झालो. पेट्रोलिंगला जात असताना पोलीस कॉन्स्टेबल कदम

आम्हांला भेटले. आम्ही त्यांना आमचेसोबत घेतले. त्यानंतर आम्ही बाजारपेठचे दिशेने मोटरसायकलने निघालो. माझेकडे एमएच.०७/जी/००२० या नंबरची मोटरसायकल होती. गांवकर नाका येथे रस्ता खोदण्याचे काम सुरू होते व त्या ठिकाणी कोणतेही वाहन जात नसल्याने आम्ही पुन्हा भरडनाक्याकडे निघालो. आम्ही सुमारे ६.१० वाजता झांटये हॉस्पीटल येथे पोचलो. त्यावेळी मला समोरून तीन लोक मोटरसायकलवरून येताना दिसले. म्हणून मी त्यांना थांबणेचा इशारा केला. त्या मोटरसायकलला नंबर प्लेट नव्हती, ती बजाज पल्सर मोटरसायकल होती. ती मोटरसायकल गिरीश पेडणेकर चालवत होता व त्याचे पाठीमागे राजेश पारकर आणि साईल पारकर बसलेले होते. मी त्यांचेकडे गाडी चालविणेचे लायसन्स व कागदपत्रं पडताळणीसाठी मागितले. त्यांनी गाडीचे कागदपत्र आणि ड्रायव्हींग लायसन्स दाखविले नाही व माझेशी हुज्जत घालू लागले. त्यांनी गाडीचे कागदपत्र दाखविणार नाही तसेच दंडही भरणार नाही, तुम्ही काय ते करून घ्या असे म्हणून मला शिवीगाळी केली. आरोपी राजेश पारकर मिठी मारून मला धरून राहिला. आरोपी साईल पारकर याने माझा डावा हात पिरगळला, त्यामुळे माझे डाव्या खांदयाला दुखापत झाली. साईल पारकर याने माझे कानावर आणि पोटावर ठोसे मारले. त्यावेळी रणजित पारकर आणि रमेश पारकर तेथे धावत आले. त्यांनी सुध्द्ा माझेशी हुज्जत घालून मला शिवीगाळी केली. त्यांनी माझेशी धक्काबुक्की करून मला भिलवडकर यांचे घरासमोरील गल्लीत रेटत नेले. पोलीस हेड कॉन्स्टेबल कदम मला सोडविणेस आले परंतु, त्यांना देखील त्यांनी धक्काबुक्की व शिवीगाळ केली. त्याठिकाणी लोक जमले. ती गल्ली अरूंद होती. त्या गल्लीमध्ये आरोपींनी माझे तोंड आणि गळा दाबून धरले. ते या पोलिसांला जिवंत ठेवणार नाही असे म्हणत होते. त्यांनी मला भिलवडकर यांच्या घराचे मागे असलेल्या गडग्याच्या आंत रेटत नेले. रमेश पारकर याने माझे दोन्ही पाय धरले. रणजित पारकर याने माझा गळा आणि तोंड दाबून धरले. त्यानंतर काही वेळाने पोलीस नाईक परूळेकर, पोलीस कॉन्स्टेबल राणे आणि सारंग तेथे आले. त्यानंतर आरोपी तेथून पळून गेले. त्यानंतर मी मुख्य रस्त्यावर आलो. त्याठिकाणी पोलीस स्टेशनचे इनचार्ज पीआय बुलबुले मला भेटले. मी त्यांना घ
ाटना सांगितली.

३. धक्काबुक्कीमुळे व घटनेमुळे माझा शर्ट मळला होता, तसेच दोन बटने तुटली होती तसेच माझी शिट्टी आणि शिट्टीची क्लीप तुटली होती. सदर घटनेमुळे मला माझे कर्तव्य पार पाडता आले नाही. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो. घटनेची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेतली व मला वैदयकीय तपासणीसाठी पाठविले. पोलीस कॉन्स्टेबल परब हे मला वैदयकीय तपासणीसाठी आणि उपचारासाठी घेवून गेले. मला ग्रामीण रूग्णालय, मालवण येथे नेले व माझी सायंकळी ७.३० वाजता तपासणी करून माझेवर उपचार करणेत आले. त्यानंतर मी मालवण पोलीस स्टेशनला गेलो व घटनेची फिर्याद दिली. आता मला सदरची फिर्याद दाखविली ती तीच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यास **<u>नि.क्र.४४</u>** देणेत येते.

४. माझेवर ज्यांनी हल्ला केल्या त्या आरोपींना मी ओळखू शकतो. आरोपी कोर्टासमोर हजर आहेत.

५. फिर्याद नोंदविल्यानंतर मी माझा शर्ट दिला व तो पोलिसांनी जप्त केला. दुस—या दिवशी अेपीआय केराम यांनी मला घटनास्थळावर घटनास्थळ दाखविणेसाठी बोलाविले. मी घटनास्थळ त्यांना दाखविले. घटनास्थळावर शेडजवळ माझी शिट्टी व त्याची क्लीप मिळून आली. माझे शर्टची काळया रंगाची दोन बटने गल्लीमध्ये पडलेली मिळून आली. त्याप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा केला. मी बटने, शर्ट, शिट्टी, शिट्टीची क्लीप दाखविल्यास ओळखू शकतो.

६. आता मला मुद्देमाल **शर्ट अर्टिकल—१** दाखविला, तो माझाच शर्ट आहे, त्यावर माझे नावाची प्लेट आहे. सदरचा शर्ट मी घटनेच्या वेळी घातलेला होता. आता मला **मुद्देमाल शर्टची २ बटने दाखविली ती तीच आहेत, त्यास अर्टिकल—२** देण्यात आले. सदरची बटने ही माझ्याच अर्टिकल—१ या शर्टाची बटने आहेत. आता मला **मुद्देमाल शिट्टी दाखविली, ती तीच आहे. त्यास अर्टिकल—३ देणेत आले**. आता मला **मुद्देमाल क्लीप दाखविली ती**

**तीच आहे, त्यास अर्टिकल—४ देण्यात आले.** आरोपी ज्या मोटारसायकलने जात होते ती मोटारसायकल मला दाखविल्यास मी ओळखू शकतो.

७. आज रोजी मी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस म्हणून कार्यरत असलेबाबत माझे ओळखपत्र सोबत आणले आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.एस.डी.देसाई यांचा**

नि.क्र.४५ चे अर्जावरील आदेशान्वये उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
बरोबर असल्याचे मान्य व कबुल केले.

दिनांक—१०/१२/२०२१

(आर.बी.रोटे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.

..........................

शपथेवर उलटतपास सुरू.

उलटतपास आरोपी क्र.१,४ व ५ तर्फे वकील श्री.एस.डी.देसाई यांचा.

८. २८/११/२०१४ रोजी मी संध्याकाळी साडेसात वाजता औषधोपचारासाठी हॉस्पीटलला गेलो होतो. आजारी असताना वैदयकीय रजा घेणेसाठी वैदयकीय प्रमाणपत्र दयावे लागते. घटनेपुर्वी ८ ते १० दिवसापुर्वी मी वैदयकीय रजा घेतली नव्हती. घटनेपुर्वी मला कुडाळ येथील डॉ.नवांगुळ यांचेकडून उपचार घेणेचा योग आला नव्हता.

९. दि.२८/११/२०१४ रोजी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत माझी

डयुटी होती. या काळामध्ये मी नाकाबंदी, पेट्रोलिंग तसेच ट्राफिक डयुटी अशा वेगवेगळया डयुटया करीत होतो. तशी नोंद डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये केली होती. त्यावेळचे पोलीस स्टेशनचे इनचार्ज डयुटी देण्याचे काम करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझी डयुटी २७/११/२०१४ रोजी २०.०० वाजता ते २८/११/२०१४ रोजी २०.०० वाजता अशी होती. आता मला डयुटी बटवडा रजिस्टरची प्रत दाखविली. हे म्हणणे खरे आहे की, डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये माझी डयुटी २७/११/२०१४ रोजी २०.०० वाजता ते २८/११/२०१४ रोजी २०.०० वाजता अशी दाखविली आहे. पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस माझे डयुटीच्या कालावधीमध्ये पुर्ण वेळ माझेसोबत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आणि पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस यांची डयुटी, डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये एकत्र घालणेत आली होती. नाकाबंदीची वेळ वगळता मी आणि पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस वेगवेगळया डयुटीवर होतो. मी आणि पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस एकाच वेळी सकाळी डयुटीवर गेलो नव्हतो. त्या दिवशी पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस मला सायंकाळी १६.०० वाजता भेटले. मी आणि फर्नांडीस १८.०० वाजेपर्यंत एकत्र होतो. १८.०० वाजता फर्नांडीस कोठे गेले याची मला माहिती नाही. आता मला डयुटी बटवडा रजिस्टर दाखविणेत आले, सदर दस्त उलटतपासामध्ये रेफर केल्यामुळे त्यास **नि.क.४८** देण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सदर डयुटी बटवडा रजिस्टरप्रमाणे माझी व फर्नांडीस यांची २७/११/२०१४ रोजी २०.०० वाजता ते २८/११/२०१४ रोजीचे २०.०० वाजेपर्यंत भरडनाका आणि नाकाबंदी यासाठी डयुटी लावली होती. आम्ही दिलेली डयुटी सोडून दुस—या कामासाठी गेलो असे घडले नाही. त्या दिवशी नाकाबंदी करणेसाठी आम्ही भरडनाका येथे एकाच ठिकाणी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मला त्या दिवशी भरडनाका येथे डयुटी दिली असल्यामुळे मला दुसरीकडे जाण्याचा कोणताही अधिकार नव्हता. मी सायंकाळी ६.०० वाजता भरडनाका येथून गेलो त्यावेळी तेथे कोणीही पोलीस नव्हते.

प्रश्न — भरडनाका येथील डयुटी सोडून मालवण बाजारपेठेत जाणेपुर्वी तुम्ही पोलीस स्टेशनला त्याबद्दल कळविले का? व त्याबद्दल स्टेशन डायरीला नोंद घेण्यास सांगितले काय?

उत्तर —सकाळी स्टेशन डायरीला ऐन्ट्री करून जातो त्यानंतर पॉईट सोडावा लागल्यास ऐन्ट्री करण्याची गरज नाही, कारण ते ट्राफिक डयुटीमध्येच येते.

हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.४८ चे डयुटी बटवडयाचे लिस्टमध्ये मला ट्राफिक डयुटी आणि पेट्रोलिंग डुटी दिल्याबाबतची नोंद नाही.

१०. त्या दिवशी वैदयकीय तपासणी झालेनंतर मी पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनला किती वाजता गेलो ती वेळ मला निश्चित सांगता येणार नाही. मालवण नगरपालिकेने रस्त्याचे काम बंद आहे त्यामुळे ट्राफिक दुसरीकडून वळवा अशा संदर्भात त्यादिवशी मला कोणतेही पत्र दिले नव्हते. राजेश कामतेकर याला मी ओळखत होतो. त्याचे एस.टी.स्टॅन्डचे बाजूला हॉटेल आहे. २८/११/२०१४ रोजी माझी राजेश कामतेकर बरोबर भेट झाली नाही. त्या दिवशी मी आरोपी क्र.१ याला १८.१० वाजता झांटये हॉस्पीटलसमोर रस्त्यावर प्रथम पाहिले. त्यादिवशी सायंकाळी १८.०० वाजता मी भरडनाक्यावर होतो. भरडनाका येथून झांटये हॉस्पीटल येथे पोहोचण्यास मोटरसायकलने दोन मिनिटे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, भरडनाका ते झांटये हॉस्पीटल या रस्त्यावर दोन्ही बाजूला दुकाने आहेत व ती मुख्य बाजारपेठ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सायंकाळी ६.०० ते ६.३० चे सुमारास या रस्त्यावर बरीच गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की, भरडनाका येथे पाच रस्ते मिळत असल्यामुळे त्या ठिकाणी बरीच वाहतूक असते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे भरडनाक्यावर ट्राफिक कंट्रोल करण्यासाठी पोलीस संध्याकाळी हजर असतात. हे म्हणणे खरे आहे की, संध्याकाळी ६.०० वाजता ट्राफिकची बरीच गर्दी असल्यामुळे भरडनाक्यावर पोलीस ट्राफिक कंट्रोल करीत असतात.

प्रश्न— सायंकाळी ६.०० ते ७.०० चे सुमारास ट्राफिक जास्त असल्यामुळे भरडनाका येथील ट्राफिक पोलीस ते ठिकाण सोडून निकडीची आवश्यकता असल्याशिवाय जात नाहीत?

उत्तर —त्या दिवशी भरडनाक्यावर डयुटी करीत असताना बाजारपेठमधून मोटरसायकलवाले पुढे जावून परत येत होते म्हणून मी तेथे पाहणेसाठी गेलो होतो.

वरील बाब मी फिर्याद दाखल करताना सांगितली होती. माझे म्हणणे प्रमाणे बाजारपेठेमध्ये रस्ता खोदल्यामुळे ब्लॉक झाला होता, त्यामुळे मी तेथे पाहणेसाठी गेलो होतो. मोटारसायकल पेट्रोलिंग असे डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये नमूद केले आहे ते म्हणजे मोटरसायकलवरून गस्त घालणे होय. पेट्रोलिंग आणि ट्राफिक ब्लॉक झाले असेल तर ते सोडविणे यामधील फरक मला कळतो. माझ्या म्हणणे प्रमाणे माझी नाकाबंदीची डयुटी १८.०० वाजता संपली.

प्रश्न— मालवण बाजारपेठेमध्ये गस्त घालून परत येत असताना घटना घडली काय?

उत्तर —मी रस्ता खोदलेला आहे की नाही याची खात्री करणेसाठी गेलो होतो तेथून परत येत असताना घटना घडली.

हे म्हणणे खरे नाही की, दुचाकी वाहन चालक पुढे जावून परत येत होते म्हणून मी त्या ठिकाणी ते पाहणेसाठी गेलो असे माझे फिर्यादीमध्ये नमूद केलेले नाही.

(कोर्टाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारीखपर्यंत तहकूब.)

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
बरोबर असल्याचे मान्य व कबुल केले.

स्वाक्षरी/—

दिनांक—२२/०३/२०२२

(आर.बी.रोटे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
**सिंधुदुर्ग—ओरोस.**

**<u>पुढील उलटतपास पुन्हा शपथेवर सुरू.</u>**

**<u>पुढील उलटतपास आरोपी क्र.१,४ व ५ तर्फे वकील श्री.एस. डी.देसाई यांचा.</u>**

११. मारामारीचा प्रकार सुमारे पाच मिनिटे चालू होता. त्या दरम्यान मी आरोपींना थोपविणेचा प्रयत्न केला नाही. कदम कॉन्स्टेबल यांनी देखील बळाचा वापर करून त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला नाही. घटनेचा प्रकार चालू असताना इतर पोलीस तेथे आले नाहीत. पोलीस त्या ठिकाणी घटनेचा प्रकार संपत असताना आले. तीन पोलीस त्या ठिकाणी आले होते. इतर पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडणेचा प्रयत्न केला किंवा कसे हे मला माहिती नाही. मी त्यांना पकडणेच्या स्थितीमध्ये नव्हतो त्यामुळे मी त्यांचेपैकी कोणालाही पकडले नाही. त्या ठिकाणी लोकांची बरीच गर्दी जमलेली होती. त्या ठिकाणी किती लोक जमा झाले होते हे मी सांगू शकत नाही. गर्दीमधील लोकांनी हल्लेखोरांना पकडणेचा प्रयत्न केला किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. लोकांची गर्दी रस्त्यावर होती आणि घटना गल्लीमधील घराचे पाठीमागे घडली. घटनेमध्ये मला माझ्या शरीराला जखमा झाल्या नव्हत्या. माझ्या शरीरावर मारहाणीच्या खाणाखुणा झाल्या नव्हत्या. नेहमी डयुटीवर असताना मी शर्टची बटणे लावलो.

१२. घटनेनंतर ट्रिपल शीट मोटरसायकल चालविल्याबद्दल व नंबर प्लेट न लावल्याबद्दल गुन्हा दाखल केला नव्हता. त्या दिवशी माझ्याकडे चलन बनविणेसाठी पावती पुस्तक होते. त्यावेळी ट्रिपलशीट विनानंबर प्लेट मोटरसायकल चालविलेबाबत मी पावती तयार केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये मोटार वाहन अधिनियमांतर्गत गुन्हयाची कलमे नमूद केलेली नाहीत. भरडनाका मालवण येथे सायंकाळी ५.४५ चे सुमारास घडलेल्या घटनेबाबत मालवण पोलीस स्टेशन येथे २८/११/२०१४ रोजी भा.द.वि.क्र.३२३, ५०४ आणि ४२७ अन्वये गुन्हा दाखल झाला होता किंवा कसे याची मला माहिती नाही. त्याप्रमाणे मालवण पोलीस स्टेशन येथे स्टेशन डायरी नोंद क्र. ३३३/२०१४ अन्वये सायंकाळी ६.४५ वाजता नोंद केली आहे किंवा कसे याची मला माहिती नाही. मला नंतर समजले की, राजेश दिपक कामतेकर याने आरोपी

राजेश रमेश पारकर व अनोळखी दोन व्यक्तींनी त्याला भरडनाका येथे दि. २८/११/२०१४ रोजी सायंकाळी ५.४५ वाजता मारहाण केली. माझे समोर असा मारहाणीचा प्रकार घडलेला नव्हता. असे घडले नाही की, भरडनाका येथील डयुटीसोडून मी इतरत्र निघून गेलो त्यामुळे तेथे काय घडले याची मला माहिती नाही. त्या दिवशी ५.४५ चे सुमारास मारामारीची घटना घडलेली आहे व त्याबाबत चौकशी करणेची माहिती मला मिळालेली नव्हती. राजेश कामतेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून मालवण पोलीस स्टेशनची टिम चौकशीसाठी भरडनाका येथे आली होती किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मालवण पोलीस स्टेशनची टिम भरडनाका येथे पोहोचली त्यावेळी मी डयुटीसोडून इतरत्र कुठेतरी गेलो होतो. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, मी डयुटी सोडून सरकारी कामासाठी गांवकरनाका येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी डयुटीवर हजर नसल्यामुळे माझ्यावर कारवाई होवू नये या हेतूने मी आरोपीकडे गेलो व त्यांना पोलीस स्टेशनला येण्यास सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा आरोपींनी त्याबद्दल चौकशी केली त्यावेळी मी त्यांना समाधानकारक उत्तरे देवू शकलो नाही आणि त्यांना मी जबरदस्तीने पोलीस स्टेशनकडे नेवू लागलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला त्यांना बेकायदेशीरपणे पोलीस स्टेशनला का नेत आहात याची विचारणा केली त्याचा मला राग आला व मी डयुटीवर नसल्यामुळे कारवाई होवू नये म्हणून मी आरोपींच्या विरूध्द् खोटी केस दाखल केली आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, *दि.२८/११/२०१४ रोजी मी मालवण पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होतो, घटनेपुर्वी ५ वर्षे मी मालवण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो, दि.२८/११/२०१४ रोजी मी भरडनाका येथे वाहतुक नियंत्रक, नाका बंदी व पेट्रोलिंग डयुटीवर होतो, सदरची डयुटी ही २७/११/२०१४ रोजी रोलकॉलवर ठरविली होती, रोलकॉलच्या वेळी मी पोलीस स्टेशनमध्ये हजर होतो, डयुटी नेमणूकी बाबतची नोंद डयुटी बटवडा रजिस्टरमध्ये केली जाते, पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस हे देखील माझेसोबत नाकाबंदी डयुटीवर होते* हे मी खोटे सांगत आहे.

१४.   हे म्हणणे खरे नाही की, *दि.२८/११/२०१४ रोजी मी प्रथम पोलीस स्टेशनला गेलो, त्यानंतर ड्रेसवर मी भरडनाका येथे सकाळी ०९.०५ वाजता डयुटीवर रवाना झालो व तशी नोंद स्टेशन डायरीला घेणेत आली, माझे अंगावर त्यावेळी ट्राफिक पोलीसचा पांढरा शर्ट व खाकी पॅन्ट असा ड्रेस होता, मी दुपारी एक वाजेपर्यंत डयुटी केली व पोलीस स्टेशनला गेलो, त्यानंतर ४.०० वाजता मी पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस यांचेबरोबर पुन्हा भरडनाका येथे नाकाबंदीसाठी गेलो, आम्ही सायंकाळी सहा वाजेपर्यंत नाकाबंदी डयुटी केली, सायंकाळी ६.०० वाजता आम्ही बाजारपेठ पेट्रोलिंगसाठी रवाना झालो, पेट्रोलिंगला जात असताना पोलीस कॉन्स्टेबल कदम आम्हांला भेटले, आम्ही त्यांना आमचेसोबत घेतले, त्यानंतर आम्ही बाजारपेठचे दिशेने मोटरसायकलने निघालो, माझेकडे एमएच.०७/जी/००२० या नंबरची मोटरसायकल होती, गांवकर नाका येथे रस्ता खोदण्याचे काम सुरू होते व त्या ठिकाणी कोणतेही वाहन जात नसल्याने आम्ही पुन्हा भरडनाक्याकडे निघालो, आम्ही सुमारे ६.१० वाजता झांटये हॉस्पीटल येथे पोचलो, त्यावेळी मला समोरून तीन लोक मोटरसायकलवरून येताना दिसले, म्हणून मी त्यांना थांबणेचा इशारा केला, त्या मोटरसायकलला नंबर प्लेट नव्हती, ती बजाज पल्सर मोटरसायकल होती, ती मोटरसायकल गिरीश पेडणेकर चालवत होता व त्याचे पाठीमागे राजेश पारकर आणि साईल पारकर बसलेले होते, मी त्यांचेकडे गाडी चालविणेचे लायसन्स व कागदपत्रं पडताळणीसाठी मागितले, त्यांनी गाडीचे कागदपत्र आणि ड्रायव्हींग लायसन्स दाखविले नाही व माझेशी हुज्जत घालू लागले, त्यांनी गाडीचे कागदपत्र दाखविणार नाही तसेच दंडही भरणार नाही, तुम्ही काय ते करून घ्या असे म्हणून मला शिवीगाळी केली, आरोपी राजेश पारकर मिठी मारून मला धरून राहिला, आरोपी साईल पारकर याने माझा डावा हात पिरगळला, त्यामुळे माझे डाव्या खांदयाला दुखापत झाली, साईल पारकर याने माझे कानावर आणि पोटावर ठोसे मारले, त्यावेळी रणजित पारकर आणि रमेश पारकर तेथे धावत आले, त्यांनी सुध्दा माझेशी हुज्जत घालून मला शिवीगाळी केली, त्यांनी माझेशी धक्काबुक्की करून मला भिलवडकर यांचे घरासमोरील गल्लीत रेटत नेले, पोलीस हेड कॉन्स्टेबल कदम मला सोडविणेस आले परंतु, त्यांना देखील त्यांनी धक्काबुक्की*

*व शिवीगाळ केली, त्याठिकाणी लोक जमले, ती गल्ली अरूंद होती, त्या गल्लीमध्ये आरोपींनी माझे तोंड आणि गळा दाबून धरले, ते या पोलिसांला जिवंत ठेवणार नाही असे म्हणत होते. त्यांनी मला भिलवडकर यांच्या घराचे मागे असलेल्या गडग्याच्या आत रेटत नेले, रमेश पारकर याने माझे दोन्ही पाय धरले, रणजित पारकर याने माझा गळा आणि तोंड दाबून धरले, त्यानंतर काही वेळाने पोलीस नाईक परूळेकर, पोलीस कॉन्स्टेबल राणे आणि सारंग तेथे आले, त्यानंतर आरोपी तेथून पळून गेले, त्यानंतर मी मुख्य रस्त्यावर आलो, त्याठिकाणी पोलीस स्टेशनचे इनचार्ज पीआय बुलबुले मला भेटले, मी त्यांना घटना सांगितली* हे मी खोटे सांगत आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, *धक्काबुक्कीमुळे व घटनेमुळे माझा शर्ट मळला होता, तसेच दोन बटने तुटली होती तसेच माझी शिट्टी आणि शिट्टीची क्लीप तुटली होती, सदर घटनेमुळे मला माझे कर्तव्य पार पाडता आले नाही, त्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेलो, घटनेची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेतली व मला वैदयकीय तपासणीसाठी पाठविले, पोलीस कॉन्स्टेबल परब हे मला वैदयकीय तपासणीसाठी आणि उपचारासाठी घेवून गेले, मला ग्रामीण रूग्णालय, मालवण येथे नेले व माझी सायंकळी ७.३० वाजता तपासणी करून माझेवर उपचार करणेत आले, त्यानंतर मी मालवण पोलीस स्टेशनला गेलो व घटनेची फिर्याद नि.क्र.४४ दिली,* हे मी खोटे सांगत आहे.

१६. हे म्हणणे खरे नाही की, *फिर्याद नोंदविल्यानंतर मी माझा शर्ट दिला व तो पोलिसांनी जप्त केला, दुस—या दिवशी अेपीआय केराम यांनी मला घटनास्थळावर घटनास्थळ दाखविणेसाठी बोलाविले, मी घटनास्थळ त्यांना दाखविले, घटनास्थळावर शेडजवळ माझी शिट्टी व त्याची क्लीप मिळून आली, माझे शर्टची काळया रंगाची दोन बटने गल्लीमध्ये पडलेली मिळून आली, त्याप्रमाणे घटनास्थळाचा पंचनामा केला, मी बटने, शर्ट, शिट्टी, शिट्टीची क्लीप दाखविल्यास ओळखू शकतो,* हे मी खोटे सांगत आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही *मुद्देमाल शर्ट अर्टिकल—१, मुद्देमाल शर्टची*

*२ बटने अर्टिकल—२,मुद्देमाल शिट्टी अर्टिकल—३ व मुद्देमाल क्लीप अर्टिकल—४ तसेच आरोपी ज्या मोटारसायकलने जात होते ती मोटारसायकल मी ओळखू शकतो* हे मी खोटे सांगत आहे.

( आरोपी क्र.१,४ आणि ५ यांचा उलटतपास पुर्ण.)

**उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे वकील श्री.वाय.आर.खानोलकर.**

(आरोपी क्र.१,४ व ५ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे स्विकारणेत आला.)

१८. हे म्हणणे खरे आहे की, साईल पारकर आणि साईनाथ पारकर अशी दोन वेगवेगळी नावे आहेत. मी फिर्याद दाखल करताना साईनाथ पारकर याने मला मारहाण केलेबाबत सांगितले नव्हते. पोलीस स्टेशनमध्ये तपास अधिकारी यांनी आरोपी साईनाथ पारकर याची ओळखीची खातरजमा माझेकडून करून घेतली होती. त्याप्रमाणे माझा पुरवणी जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी साईनाथ पारकर याचा फिर्यादीमध्ये नमूद केलेला साईल पारकर याचेशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी व वेळी आरोपी साईनाथ पारकर हा मालवणमध्ये उपस्थित नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ इतर आरोपींचा नातेवाईक असल्यामुळे त्याला खोटया केसमध्ये गुंतविणेत आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कधीही मारहाण केलेली नाही व माझा डावा हात पिरगळलेला नाही.

( आरोपी क्र.२ यांचा उलटतपास पुर्ण.)

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री.व्ही.पी.चिंदरकर.**

१९. २८/११/२०१४ रोजी मी डयुटी केली की नाही हे स्टेशन डायरीवरून समजून येईल. २८/११/२०१४ रोजीच्या स्टेशनडायरीची नोंद या कामी दाखल केली आहे की नाही याची मला माहिती नाही. पोलीस कॉन्स्टेबल फर्नांडीस यांची दि.२८/११/२०१४ रोजीच्या डयुटीबाबत स्टेशनडायरीची नोंद हजर केली आहे की नाही याची मला माहिती नाही.

२०. २८/११/२०१४ रोजीची सकाळी ९.०५ वाजताची स्टेशन डायरीची नोंद पोलीस पेपर्समध्ये हजर केली आहे. माझी सुमारे १२ ते १३ वर्षे पोलीस खात्यात नोकरी झाली आहे. मी वाहतूक नियंत्रक म्हणून मालवण पोलीस स्टेशनला रूजू असताना काही दिवस डयुटी केली. हे म्हणणे खरे आहे की, वाहतूक नियंत्रक आणि पोलीस कॉन्स्टेबल यांचे ड्रेस वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेला पांढरा शर्ट आणि खाकी पॅन्ट हा ड्रेस वाहतूक पोलीसाचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, ट्राफीक पोलीसचा ड्रेस पांढरा शर्ट आणि पांढरी पॅन्ट असा असतो.

२१. जिल्हयामध्ये ट्राफीक पोलिसांची स्वतंत्र शाखा आहे. परंतु, पोलीस स्टेशनला पोलीस स्टेशनपैकी एक कर्मचारी ट्राफीक नियंत्रणासाठी नेमलेला असतो. ट्राफीक शाखेचा कर्मचारी मालवण पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये त्यावेळी नियुक्त केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, ट्राफीकचे स्वतंत्र शाखेचे नाव जिल्हा वाहतूक शाखा असे आहे. त्याचे मुख्यालय ओरोस येथे आहे. माझी नियुक्ती जिल्हा वाहतूक शाखा, ओरोस येथे केलेली नव्हती.

२२. मला नाकाबंदी या शब्दाचा अर्थ माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, नाकाबंदी ट्राफीक बंद करून एखादया गाडीची किंवा गुन्हयाची चौकशी करणेसाठी केली जाते. त्यावेळी बॅरीगेटस् लावून नाकाबंदी केली नव्हती. नाकाबंदी करताना ज्या व्यक्तींची किंवा वाहनांची चौकशी केली जाते त्याच्या नोंदी ठेवल्या जातात. त्यासाठी स्वतंत्र कच्चे रजिस्टर ठेवले जाते. २८/११/२०१४ रोजीचे नोंदीचे रजिस्टर मी ठाणे अंमलदार यांना दिले होते.

२३. हे म्हणणे खरे नाही की, मी ६.०० वाजेपर्यंत नाकाबंदी डयुटी केली व त्यानंतर बाजारपेठ पेट्रोलिंगसाठी रवाना झालो असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पेट्रोलिंगसाठी जात असताना मला पोलीस हेडकॉन्स्टेबल कदम भेटले असे मी खोटे सांगितले आहे. त्या दिवशी पोलीस हेड कॉन्स्टेबल कदम यांची डयुटी जिल्हा विशेष शाखा सिंधुदुर्ग येथे होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना पेट्रोलिंग डयुटीसाठी सोबत घेतले असे मी खोटे सांगितले आहे.

२४. मी मालवणमध्ये कोर्टाच्या इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या पोलीस क्वॉर्टर्समध्ये राहत होतो. हे म्हणणे खरे आहे की, मालवण कोर्टाच्या इमारतीच्या समोर तहसील ऑफीस आणि पोलीस स्टेशन आहे. हे म्हणणे खरे आहे की, मालवण पोलीस स्टेशन येथून भरडनाका येथे जाणेसाठी थेटरच्या बाजूने वनवेने जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, भरडनाका येथून पोलीस स्टेशनकडे जाणेसाठी बाजरपेठेतून वनवेतून जावे लागते. गांवकरनाका बाजारपेठेत आहे. भरडनाक्यापासून गांवकरनाका तीनशे ते चारशे मीटर अंतरावर आहे. गांवकर नाका येथे भुयारी गटाराचे काम चालू होते, ते केव्हा पासून सुरू होते ते मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांची आगाउ परवानगी घेतल्याशिवाय रस्त्याचे खोदकाम करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, झांटये हॉस्पीटलजवळ तीन लोक मोटारसायकलवरून येताना दिसले असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटारसायकल नं.एम.एच. —०७/जी—००२० ने पेट्रोलिंग करीत होतो असे खोटे सांगितले आहे. ही मोटारसायकल शासनाच्या मालकीची होती. ती मोटारसायकल मला दिल्याबाबत लॉकबुकला नोंद केलेली आहे. आम्ही संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचेकडे सरकारी मोटारसायकल घेत असतो. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मोटारसायकल पोलीस निरीक्षक यांचेकडून घेणेत आली नव्हती. २८/११/२०१४ रोजी पी.आय.बुलबुले हे मालवण पोलीस स्टेशनचे इनचार्ज होते. पायी पेट्रोलिंग करणे आणि वाहनाने पेट्रोलिंग करणे यामध्ये फरक आहे. भरडनाक्याकडून गावकर नाक्याकडे जाताना गावकर नाक्याच्या अलिकडे झांटये हॉस्पीटल आहे.

२५. गांवकर नाका ते झांटये हॉस्पीटल यामध्ये शंभर ते दिडशे मीटर अंतर आहे. गांवकर नाका येथे भुयारी गटार खोदण्याचे काम चालू होते. दुपारी डयुटी संपल्यानंतर मी माझे घरी जेवणासाठी गेलो होतो. मी घरी बाजारपेठेच्या रोडने गेलो. त्यावेळी बाजारपेठेतील रस्ता खोदलेला होता परंतु, गाडया जात होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मालवण शहरामध्ये भुयारी गटाराचे काम रस्त्याचे मधोमध केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोदकामाची माती रस्त्याचे दोन्ही बाजूला लावलेली होती.

२६. हे म्हणणे खरे नाही की, गिरीश पेडणेकर हा बजाज पल्सर ही मोटारसायकल चालवित होता राजेश पारकर व साईल पारकर मागे बसले होते असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, रणजित पारकर आणि रमेश पारकर तेथे धावत आले असे मी खोटे सांगितले आहे. फिर्याद दाखल करणेपुर्वी ५ वर्षे मी मालवण शहरातच डयुटी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही व त्यामुळे मोटर वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांचेकडे गाडीचे कागदपत्र व वाहन परवाना मागितला परंतु, ते माझेशी हुज्जत घालू लागले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ट्राफिक पोलीस यांनी कागदपत्र मागितले व ते वाहन चालकाने दिले नाहीत तर हा मोटर वाहन कायदयाअंतर्गत स्वतंत्र गुन्हा आहे.

२७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला शिवीगाळ केली असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्षात शिवीगाळ केली नसल्यामुळे कोणती शिवीगाळ केली हे मी फिर्यादमध्ये नमूद केलेले नाही.

२८. हे म्हणणे खरे नाही की, भिलवडकर यांच्या घराच्या मागे आरोपीने मला रेटत नेले असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, भिलवडकर यांच्या घरासमोर गल्ली नाही. भिलवडकर यांचे घर बाजारपेठमध्ये जाणा—या रस्त्याला लागून आहे. बाजारपेठ रोड आणि गल्ली हे स्वतंत्र रोड आहेत.

२९. हे म्हणणे खरे आहे की, मालवण मधील प्रत्येक गल्ली व बोळास नाव आहे. भिलवडकर यांच्या गल्लीबाबतचे रेकॉर्ड मी तपास अधिकारी यांना दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तशी कोणतीही गल्ली भिलवडकर यांच्या घरासमोर नाही म्हणून तसे रेकॉर्ड मी दिले नाही.

३०. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी रमेश पारकर यांचे मालवण बाजारपेठेत एक दुकान आहे. आरोपी क्र.३ रणजित पारकर हा त्यांच्या दुकानात

काम करतो किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.४ चे दुकान गांवकर नाक्याच्या पलिकडे मालवण पोलीस स्टेशनच्या दिशेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला धक्काबुक्की केली व त्या ठिकाणी लोक जमले असे मी खोटे सांगितले आहे. गडग्याची तसेच गटारांची नोंद नगरपालिकेच्या रेकॉर्डला असते याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस नाईक परूळेकर, पोलीस कॉन्स्टेबल राणे आणि सारंग तेथे आले आणि त्यानंतर आरोपी पळून गेले असे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी रस्त्यावर आलो, पोलीस निरीक्षक बुलबुले मला भेटले व मी त्यांना घटना सांगितली असे देखील मी खोटे सांगितले आहे.

३१. माझ्या ड्रेसचा शर्ट मला डिपार्टमेंटने दिला होता. ट्राफिक शाखेचे शर्ट पालव नावाचे टेलर शिवतात किंवा कसे हे मला माहीत नाही. आमचा ड्रेस, बुट, कॅप, शिटी सर्व गोष्टी सरकारने पुरविल्या आहेत. मी दोषारोपपत्र पाहिलेले आहे.

३२. भरडनाका ते मालवण पोलीस स्टेशन हे अंतर दोन ते सव्वादोन कि. मी. चे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मालवण येथील सरकारी दवाखाना भरडानाका आणि पोलीस स्टेशन यांचे मधोमध आहे.

(कोर्टाची वेळ संपल्याने साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारीखपर्यंत तहकूब)

साक्षीदार यास जबानी समक्ष वाचून दाखविली,
बरोबर असल्याचे मान्य व कबुल केले.

दिनांक—१९/०४/२०२२

(आर.बी.रोटे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
**सिंधुदुर्ग—ओरोस.**